**विभागीय शिक्षण उपसंचालक, पुणे विभाग, पुणे-१,**
१७,डॉ.आंबेडकर मार्ग,लाल देवळासमोर, पुणे-४११ ००१.
दुरध्वनी क्र.-०२०-२६१२२२१७ ई मेल आय डी क्र. dydpune@gmail.com ,वेब साईट- www.dydepune .com

**अत्यंत महत्त्वाचे**
**ई-मेल**

जा.क्र.शिउसं/उमाशि-४०२/संच मान्यता २०१७-१८/२०१७
दिनांक :- १७.१०.२०१७

16 NOV 2017

प्रति,

प्राचार्य, (फक्त पाथर्डी तालुका)
अनुदानित/विनाअनुदानित/स्वयंअर्थसहाय्यित
कनिष्ठ महाविद्यालय/ उच्च माध्यमिक/
वरिष्ठ महाविद्यालय सलग्न कनिष्ठ महाविद्यालय, पाथर्डी जि.अहमदनगर

**विषय :- पाथर्डी तालुक्यातील सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यतेबाबत**

**संदर्भ :-१)दि.१३.१०.२०१७ रोजी मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) शिक्षण संचालनालय, पुणे येथे झालेल्या सहविचार सभेमध्ये दिलेली सुचना**
**२) या कार्यालयाचे पत्र जा.क्र.शिउसं/उमाशि-४०२/संच मान्यता २०१७-१८/ २०१७/७६५० दिनांक १७.१०.२०१७**
**३) या कार्यालयाचे पत्र दिनांक १३.११.२०१७**

उपरोक्त संदर्भिय विषयान्वये आपणांस कळविण्यात येते की, सन २०१७-१८ या शैक्षणिक वर्षाकरिता उच्च माध्यमिक शाळांच्या संच मान्यता ऑफलाईन पध्दतीने करण्याबाबत दि.१३.१०.२०१७ च्या बैठकीमध्ये सुचित करण्यात आलेले आहे. त्यानुषंगाने या कार्यालयाचे संदर्भ क्र-२ च्या पत्रान्वये संच मान्यता शिबीर सोबत जोडलेल्या वेळापत्रकानुसार आपल्या महाविद्यालयात आयोजित केलेले आहे.

अहमदनगर जिल्हयातील फक्त पाथर्डी तालुक्यातील सर्व अनुदानित /विनाअनुदानित/ स्वयंअर्थसहाय्यित उच्च माध्यमिक शाळा/ कनिष्ठ महाविद्यालय यांनी संच मान्यतेसाठी नस्ती सादर करतांना खालील कागदपत्रांची पुर्तता करावी.

१) जनरल रजिष्टर, मुळ दाखले,
२) आपल्या महाविद्यालयात प्रवेशित झालेलया विद्यार्थ्यांचे हजेरी पत्रक जुलै-२०१७ पासून ते आज अखेर प्रत्येक महिन्याचे साक्षांकित प्रत संच मान्यता नस्तीमध्ये सादर करावे.
३) बाहेरच्या जिल्हयातुन आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात इ.११ वी व इ. १२ वी साठी प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांची स्वतंत्र यादी प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह सादर करावी.
४) बाहेरच्या जिल्हयातील प्रवेश व अतिरिक्त प्रवेश दिले असल्यास शिक्षणाधिकारी (माध्य) जि.प.अहमदनगर यांची परवानगी प्रत सोबत सादर करावी.
५) अहमदनगर जिल्हयातील विद्यार्थी आपल्या कनिष्ठ महाविद्यालयात प्रवेशित झाला असेल तर त्याची स्वतंत्र यादी प्राचार्य यांच्या स्वाक्षरीसह सादर करावी.

(दिनकर टेमकर)
शिक्षण उपसंचालक
पुणे विभाग पुणे-१

प्रत माहितीसाठी सविनय सादर
१) मा. आयुक्त (शिक्षण) महाराष्ट्र राज्य पुणे-१
२) मा. शिक्षण संचालक (माध्यमिक व उच्च माध्यमिक) म.रा. पुणे-१
**प्रत माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी**
शिक्षणाधिकारी (माध्यमिक) जि.प.अहमदनगर

Scanned by CamScanner